महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: ०२५३- २५३९१००/३००, Fax: ०२५३ - २५३१८३६, Ph.: २५३९२१४
Email: coe@muhs.ac.in, preexam@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

MUHS

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations

जा.क्र. मआविवि/एक्सपी/ ३४१ /२०२० **By E-Mail** दि. ०५/०६/२०२०

महत्वाचे/तात्काळ
कार्यालयीन परिपत्रक

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
मआविवि, नाशिक

विषय : **विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेबाबत...**

संदर्भ : शासनाच्या धोरणास अनुसरुन व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहून

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, केंद्रिय परीषदांनी दिलेल्या निर्देशांन्वये आणि विद्यापीठ परीक्षा मंडळाच्या ठरावान्वये उन्हाळी-२०२० परीक्षेच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा (*प्रथम वर्ष वैद्यकिय अभ्यासक्रम-२०१९ वगळून*) दि. १५ जुलै, २०२० पासून आयोजित करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमनिहाय प्रत्येक वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लवकरच टाकण्यात येईल.

परीक्षार्थी विद्यार्थी व संलग्नित महाविद्यालयाच्या सोयीसाठी सदर परीक्षा हया टप्याटप्याने व विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेशित आहे त्या महाविद्यालयातच आयोजित करण्यात येणार आहेत.

तसेच उपरोक्त लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक गावानजीकच्या त्या त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा केंद्रावर ; *त्या ठिकाणी परीक्षाकेंद्र उपलब्ध असल्यास* ; लेखी व प्रात्यक्षिक परीक्षाकेंद्र बदली देण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. विद्याशाखा व जिल्हानिहाय परीक्षाकेंद्राची यादी लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

कृपया सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावी.

Received on 6/6/2020

आपला,

(डॉ. अ.ग. पाठक)
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीस्तव : (i) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
(ii) मा. प्रति-कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक